**निवेदन**
आपल्या प्रभागातील समस्या, दैनंदिन अडचणी, फसवणूक, अन्याय-अत्याचार, मुजोरी तसेच आपल्या मनातील सूचना, शंका, उपाय यासाठी सा. संघर्षाचा आवाज आपणास खास व्यासपीठ मिळवून देत आहे.
करा त्वरा, होऊ द्या मनातला निचरा!
संपर्क : ७२७६८७१००८

साप्ताहिक

# संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013
■ https://sangharshachaaawaz.in

■ वर्ष : १४ वे ■ अंक : ०४ था ■ सोमवार दि.१७ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने - ०४

विद्यार्थ्यांचे हित सर्वोच्च... पान २ वर | कंत्राटी ड्रायव्हर यांच्या मागण्या... पान ३ वर | स्वातंत्र्यदिनी राज्यपाल जिष्णू... पान ४ वर

## पुणे शहरातील रस्त्यावरील खड्डे ८ दिवसात बुजवून अहवाल सादर करा - महापौर मंजुषाताई नागपुरे

## पुणे महापालिकेतील निविदा प्रक्रियेतील अनियमितता, सीवीसी नियमांचे उल्लंघन आणि रस्त्यावरील खड्ड्यांच्या समस्येबाबत तातडीने कडक धोरण राबवावे - ॲड.निलेश निकम, विरोधी पक्षनेता

## विकास कामांच्या अनुषंगाने आदर्श कार्यपद्धतीचे (SOP) पालन करण्याची दक्षता सर्व संबंधित खातेप्रमुख यांनी घ्यावी - महापालिका आयुक्त नवल किशोर राम





साप्ताहिक
संघर्षाचा आवाज
ठेकेदार, अधिकारी आणि नगरसेवक यांच्या भ्रष्ट युतीमुळे पुणेकर नागरिकांना खड्डेमय रस्त्याला सामोरे जावे लागत आहे?
७५ कोटीचे पथ विभागाकडील काम होणार मग पावसाळ्यापुर्वी ६० ते ६८ कोटीच्या कामाचे काय?
सामाजिक कार्यकर्ते आणि जागृत नागरिकांनी पुढे आलेच पाहिजे



**पुणे** : पुणे शहरातील प्रमुख रस्ते आणि अंतर्गत रस्ते यांची अक्षरश: वाट लागल्याने पुणे शहराचे महापौर ते नगरसेवक आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी आपापल्या ताकतीनुसार आयुक्त साहेब आणि संबंधित प्रशासन अधिकारी यांना आपापल्या भागामध्ये दौरे करून रस्त्याची गंभीर परिस्थिती दाखविण्याचा प्रयत्न केला. यावर प्रशासन प्रमुख आयुक्त नवल किशोर राम यांनी संबंधित विभागांना तातडीचे आदेश देवून रस्ते दुरूस्त करण्याचे सांगितले. याच कालावधीत पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाकडील ७५ कोटीचे रस्त्याचे काम हे वादात सापडल्याने आयुक्त नवल किशोर राम यांनी यापुर्वी काढण्यात आलेल्या ७५ कोटीच्या एकूण ३ निविदा प्रत्येकी २५ कोटीच्या या रद्द करून झोन वाईज प्रत्येकी १० कोटी असे ७ झोन नुसार ७० कोटीच्या कामांना मंजुरी दिली. पण पुणे महानगरपालिकेतील प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयांना ३ कोटी ५० लाख ते ४ कोटी ५० लाख ही रक्कम प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय यांना देण्यात आली आहे. यामध्ये १) क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील चेंबर्स समपातळीत करणे, आरसीसी चेंबर्स करणे, क्षेत्रीय कार्यालय निहाय मोबाईल मेंटेनन्स युनिटव्दारे देखभाल दुरूस्तीची कामे करणे व तद्नुषंगिक इतर कामे करणे, २) क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यावर पाणीपुरवठा वाहिनी/मलनिस्सारण वाहिनी/गॅस वाहिनी/वीज वाहिनी तसेच केबल खोदाईचे रिइनस्टेटमेंन्ट करणे तसेच इतर तद्नुषंगिक कामे करणे (भाग-३), ३) क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्तयावर पाणीपुरवठा वाहिनी/मननिस्सारण वाहिनी/गॅस वाहिनी/वीज वाहिनी (पान २ वर)

## घनकचरा प्रमुख आणि अतिरिक्त आयुक्त यांच्यावर ॲट्रोसिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल होणार?

वाचा पुढील अंकात...

## देशाची सध्याची राजकीय परिस्थिती पाहता काँग्रेस पक्षाला पुन्हा संघर्ष करावा लागेल - प्रशांत जगताप, अध्यक्ष



**पुणे** : भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त काँग्रेस भवन येथे ध्वजवंदनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या हस्ते ध्वजरोहण करण्यात आले.

यावेळी बोलताना प्रशांत जगताप म्हणाले की, ''भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेकांनी हजारो सत्याग्रही आणि क्रांतीकारकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद अशा अनेक काँग्रेस नेत्यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. पं.जवाहरलाल नेहरू, लालबहादूर शास्त्री, इंदिरा गांधी, राजीव गांधी, नरसिंह राव आणि डॉ.मनमोहन सिंग यांनी देश सुजलाम- सुफलाम केला. त्यांच्या दूरदृष्टी मुळे देश खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर झाला. काँग्रेस व क्रांतीकारक ब्रिटीशांविरूध्द लढल्यामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले. देशाची सध्याच्या राजकीय परिस्थित पाहता काँग्रेसला पुन्हा एक मोठा संघर्ष करावा लागेल असे वाटते. संविधान व लोकशाहीचे रक्षण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तत्व आहे.'' (पान ३ वर)

## स्वातंत्र्य दिनानिमित्त शाखा उद्घाटन करून सफाई सेवक व लहान मुलांना खाऊ वाटप करण्यात आले



**पुणे** : १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८.४५ च्या दरम्यान क्रांती मजदूर सेना या सामाजिक संघटनेच्या शाखेचे कोरेगाव पार्क, लेन नं.५ ट्रिनीटी कोर्ट जवळ भव्यदिव्य उद्घाटन संस्थापक प्रमुख अर्जुनभाऊ ओहोळ यांच्याकडून करण्यात आले.

यावेळी सुर्यकांत उर्फ सोनुभाऊ निकाळजे, ॲड.यशदादा वालिया, श्रीकांतभाऊ चव्हाण, रामभाऊ जगदाळे, संजयभाऊ सोनवणे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन क्रांती मजदूर सेनेचे युवा अध्यक्ष किशोरभाऊ तुर्भे यांनी पुणे शहर अध्यक्ष संदिपभाऊ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली केले. (पान ३ वर)

# संपादकीय...

## विद्यार्थ्यांचे हित सर्वोच्च ठेवून पहिल्या फेरीपासून होणार समावेश

एलएलबी ३ वर्षे आणि ५ वर्षे अभ्यासक्रमांच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रिया पहिल्या फेरीपासून आता राज्यातील सर्व विधी महाविद्यालयांचा समावेश होणार आहे, अशी माहिती उच्च शिक्षण संचालनालयाने दिली आहे. या निर्णयामुळे विधी अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. वेळेत महाविद्यालयांची संलग्नता आणि बार कौन्सिल ऑफ इंडियाची (बीसीआय) मान्यता सर्वच विधी महाविद्यालये कॅप राउंडमध्ये मिळू न शकलेल्या महाविद्यालयांना सीईटी कक्षाने कॅप राउंडमधून वगळले होते. त्यासाठी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिलेल्या यादीनुसार ही कार्यवाही केली असल्याचे सीईटी कक्षाने जाहीर केले होते.

यात राज्यातील सुमारे २० महाविद्यालये सीईटी प्रवेश प्रक्रियेपासून वंचित राहणार असल्याचे उघड झाले होते. उच्च शिक्षण मंत्रालयानेही या घटनेची दखल घेत बार कौन्सिल ऑफ इंडिया आणि महाविद्यालयांत समन्वय साधला. प्रवेश प्रक्रियेला मुदतवाढ देण्याच्या सूचना सीईटी कक्षाला दिल्या.

उच्च शिक्षण संचालनालय पुणे यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विधी ३ वर्षे आणि ५ वर्षे अभ्यासक्रमाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत महाविद्यालयांचा समावेश करण्यासाठी प्राप्त प्रस्तावांची २६ जुलै २०२६ रोजी तपासणी करण्यात आली. या दिवसापर्यंत केवळ १३१ महाविद्यालयांकडे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी बीसीआय मान्यता उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले होते. उर्वरित २३२ महाविद्यायांकडे मान्यता उपलब्ध नसल्याने प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्याबाबत अडचण निर्माण झाली होती.

विद्यार्थी हिताचा विचार करून राज्य सरकारने लवचीक भूमिका घेत ज्या महाविद्यालयांनी बीसीआयकडे मान्यतेसाठी अर्ज केलेला आहे, त्यांनाही प्रवेश प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, बीसीआयने कठोर भूमिका घेत, दि.२३ जुलै २०२६ रोजीच सर्व सार्वजनिक विद्यापीठांना पत्र पाठवून विधी महाविद्यालयांची तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. मान्यता नसलेल्या विधी महाविद्यालयांमध्ये प्रवेश देऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश दिले होते.

बीसीआयचे निर्देश प्राप्त झाल्यानंतर उच्च शिक्षण संचालयायाने कोणताही विलंब न करता राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलगुरूंसोबत तातडीची बैठक घेतली. दि.३१ जुलै २०२६ रोजी सर्व विद्यापीठांना आवश्यक सूचना दिल्या. बदललेल्या परिस्थितीची तातडीने दखल घेऊन विद्यापीठे, महाविद्यालये, बीसीआय आणि प्रवेश प्रक्रिया यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. राज्यात विधीच्या ३ वर्षे अभ्यासक्रमाची २११ आणि ५ वर्षे अभ्यासक्रमाची १५२, अशी एकूण ३६३ विधी महाविद्यालये आहेत ही सर्वच्या सर्व महाविद्यालये कॅपच्या पहिल्या फेरीपासून समाविष्ट झाली आहेत. असे असले तरी महाविद्यालयांना मात्र पुढील मुदतीत मान्यतेची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. कॅपमध्ये समाविष्ट झालेल्यांमध्ये शासकीय, खासगी अनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचा समावेश आहे. महाविद्यालयांना बीसीआयकडून जास्तीत जास्त तीन वर्षांपर्यंत मान्यता दिली जाते.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी बीसीआयची मान्यता नसलेल्या महाविद्यालयांच्या प्रवेशासंदर्भात मुंबई उच्च न्यायालय तसेच छत्रपती संभाजीनगर खंडपीठासमोर विविध रिट याचिका दाखल झाल्या. यात न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार ज्या महाविद्यालयांनी बीसीआयकडे मान्यतेसाठी अर्ज सादर केलेला आहे. अशांना प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचे हित सर्वोच्च ठेवून उपलब्ध कायदेशीर आणि प्रशासकीय मार्गाचा वापर करून प्रवेश प्रक्रिया सुरळीत करण्याचा प्रयत्न राज्य सरकार करत आहे.


साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक - यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग - सी - २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे - ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात
Email : sangharshachaaawaz22@gmail.com
Email : sangharshachaaawaz@rediffmail.com
Mob. : 7276871008 / 9665487134



## सिगोलवाद सुत्त

**मला उपलब्ध वाङ्मयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरूवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.**

**जयभीम!**

**उत्तमराव सोनवणे**

**मागील अंकावरून**

६) त्याच्याबरोबर लग्नासाठी त्याला कोणतीही स्त्री पसंत करित नाही कारण तो तिाा योग्यप्रकारे उदरनिर्वाह करू शकत नाही.

ड) हे तरूण गृहस्था, हे सहा दुष्परिणाम आळसी लोकामध्ये असतात. तो कोणतेही काम करित नाही. तो काम न करण्याची अशी कारणे देतो.

१) आज खूप थंडी आहे.

२) आज अत्यंत उष्णता आहे.

३) आज रात्र झालीय, खूप उशीर झाला आहे.

४) सूर्य उक्षवायला बराच अवधी आहे खूपच लवकर का उठावे.

५) मला आता बरीच भूक लागली आहे.

६) अधिक जेवल्यामुळे थोडी वामकुक्षी घ्यावी.

अशाप्रकारे अनेक कारणे सांगून तो कोणतेही काम करित नाही. नविन धन मिळवित नाही. अशामुळे जी धूसंपत्ती आहे ती तो हळू हळू घालवून बसतो.

भगवान बुध्दांनी हे सांगितल्यावर ते पुन्हा म्हणाले कांही खाण्यापिण्याचे दोस्त असतात जो पर्यंत तुझ्याकडून कांही तरी मिळते तोपर्यंतच तुला तुझ्यासमोर मित्र–म्हणतील; ते सर्व लाभार्थी आहेत.

सूर्योदयापर्यंत झोपने, पती अुवा पत्नीचा विश्वासघात करणे, रागीट स्वभाव, **क्रमश:**

## पुणे शहरातील रस्त्यावरील खड्डे ८ दिवसात बुजवून अहवाल सादर करा...

**(पान १ वरून)** तसेच केबल खोदाईचे रिइनस्टेटमेंन्ट करणे तसेच इतर तद्नुषंगिक कामे करणे (भाग-२), ४) क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यावर पाणीपुरवठा वाहिनी/मननिस्सारण वाहिनी/गॅस वाहिनी/वीज वाहिनी तसेच तसेच केबल खोदाईचे रिइनस्टेटमेंन्ट करणे तसेच इतर तद्नुषंगिक कामे करणे (भाग-१), ५) क्षेत्रीय कार्यालयाचे अखत्यारीतील तसेच नव्याने समाविष्ट गावामधील नाला साफसफाई व तद्नुषंगिक कामे करणे, ६) क्षेत्रीय कार्यालयाचे अखत्यारीतील नाला साफसफाई व तद्नुषंगिक कामे करणे, ७) क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारीतील पावसाळी गटारांची साफसफाई व तद्नुषंगिक काम करणे. ही कामे पुणे शहरातील १५ क्षेत्रीय कार्यालयमध्ये लावण्यात आली आहे. या कामासाठी जवळ-जवळ ६० ते ६८ कोटी रूपये खर्ची टाकली आहे. असे असताना खड्डे पडले म्हणून पथ विभागाकडून ७० कोटीचे कामे करण्यात येणार. पण पावसाळ्यापुर्वी लावण्यात आलेल्या ६० ते ६८ कोटीच्या कामाचे काय. असा प्रश्न सत्ताधारी, विरोधक आणि प्रशासन यांना विचारण्यात आला होता. यावर प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत येणारे बारा मीटर रूंदीच्या आतील रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी प्रत्येकी साडेतीन कोटी रूपयांची तरतूद केली आहे. या तरतुदीनुसार निविदा प्रक्रिया पार पडली आहे. शहरातील रस्त्यांवर पावसामुळे पडलेले खड्डे आठ दिवसांमध्ये बुजवून रस्त्यांच्या डीएलपी (दोष दायित्व कालावधी) चा अहवाल द्या, असे आदेश महापौर मंजूषा नागपुरे यांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत. दरम्यान, पथ विभागाने शहरातील केवळ १९५ खड्डे बुजविणे शिल्लक असल्याची माहिती दिल्याचे महापौरांनी सांगितले.

शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले आहेत. त्या संदर्भात सातत्याने तक्रारी होत आहेत. या पार्श्वभूमीवर महापौर नागपुरे यांनी गुरूवारी दि.१३ रोजी महापालिका अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीविषयी माहिती देताना महापौर म्हणाल्या, महापालिकेने २०२५ आणि २०२६ या दोन वर्षात रस्ते बांधणी, रस्ते दुरूस्तीसाठी किती रूपये खर्च केला? पुणे सायकल टूर स्पर्धेसाठी कोणत्या रस्त्यांची कामे केली? कोणत्या ठिकाणी खड्डे पडले? कोणत्या रस्त्यांवर कोणाला खोदाईची परवानगी दिली? खोदाईनंतर संबंधित रस्ते दुरूस्ती केली आहे का? यासंदर्भात सविस्तर अहवाल आठ दिवसांत सादर करण्यास अधिकाऱ्यांना सांगितले आहे. तर विरोधी पक्षनेते ॲड.निलेश निकम यांनी पुणे महापालिकेतील निविदा प्रक्रियेतील अनियमितता, सीवीसी नियमांचे उल्लंघन आणि रस्त्यावरील खड्ड्यांच्या समस्येबाबत तातडीने कडक धोरण राबवावे म्हणून पुणे महापालिका आयुक्त यांना दि.१२/८/२०२६ रोजी निवेदन देवून गंभीर आरोप केले. ते म्हणाले की, पुणे महानगरपालिकेच्या निविदा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येणे अतिशय आवश्यक आहे असे आमचे प्रामाणिक मत आहे निविदा प्रक्रियेतील राजकीय हस्तक्षेपामुळे खड्डे दुरुस्ती निविदा उशिराने होत आहेत. परंतु यामुळे मागील दोन महिने पुणेकर नागरिकांना प्रचंड मन:सताप सहन करावा लागला आहे. निविदा सदर करण्याचा कालावधी संपल्यानंतर अ पाकीट उघडून कागदपत्रांची छानवी करून ब पाकीट उघडण्याची विशिष्ठ कालमर्यादा निश्चित नसल्यामुळे ठेकेदार,अधिकारी,राजकीय व्यक्ती यांना स्पर्धक ठेकेदारांवर दबाव आणण्यासाठी वेळ मिळतो.यामुळे दबावतंत्र वापरून पात्र ठेकेदारांना तांत्रिक दृष्ट्या अपात्र ठरवून मर्जीतील ठेकेदारांना पात्र ठरविण्यात येते.

महानगरपालिकेच्या विशेषतः पथ विभाग टेंडर प्रक्रियेत फार मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असल्याचे समोर आले असून राजकीय व्यक्ती व अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपाने मर्जीतल्या ठेकेदारांसाठी सोयीनुसार अटी व शर्ती बदलल्या जात आहेत.केंद्रीय दक्षता आयोगाच्या (CVC) मार्गदर्शक तत्त्वांनुसार ठेकेदाराने निविदा दाखल केल्यानंतर अटी व शर्तीमध्ये बदल करता येत नाही, परंतु महापालिकेत या नियमांची सर्रास पायमल्ली केली जात आहे. ठेकेदाराने निविदा सादर केल्यानंतर पात्र-अपात्रतेच्या खेळात तब्बल सहा-सहा महिने निविदेचे 'ब' पाकीट उघडले जात नाही, ज्यामुळे विकासकामे रडखडतात.महापालिका नागरिकांच्या सोयीसाठी काम करते की ठेकेदारांच्या ठेक्यासाठी, असा सवाल आता सर्वसामान्यांना पडत आहे.त्यामुळे निविदा मागवताना ठेकेदाराने सादर करावयाची कागदपत्रे व निविदेच्या छाननीसाठी द्यावयाचा वेळ याबाबत स्पष्टता येणे अत्यंत आवश्यक आहे. छाननीसाठी स्पष्टता नसल्यामुळे १ एप्रिल २०२६ ते ३१ जुलै २०२६ पर्यंत महानगरपालिकेच्या प्रमुख विभागांनी खालील प्रमाणे.ब पाकीट उघडण्याची प्रक्रिया राबवलेली आहे.ब पाकीट उघडण्याची सरासरी पहाता या प्रक्रियेमध्ये अनावश्यक हस्तक्षेप होत आहे अथवा प्रशासनाकडून हलगर्जीपणा होत आहे असे दिसून येत आहे. १ एप्रिल २०२६ ते ३१ जुलै २०२६ मागविलेल्या निविदांचा तक्ता, १) पथ विभाग, मागविलेल्या निविदा संख्या-१०२, अ पाकीट उघडले-९४, ब पाकीट उघडले-८, ब पाकीट उघडण्याची सरासरी-७.८४% २) भवन रचना विभाग, मागविलेल्या निविदा संख्या- ३३, अ पाकीट उघडले-२८, ब पाकीट उघडले-५, ब पाकीट उघडण्याची सरासरी-१५.१५% ३) विद्युत विभाग, मागविलेल्या निविदा संख्या-१६२, अ पाकीट उघडले-९३, ब पाकीट उघडले-६९, ब पाकीट उघडण्याची सरासरी-४२.५९ %, ४) ड्रेनेज विभाग, मागविलेल्या निविदा संख्या- २२, अ पाकीट उघडले-१८, ब पाकीट उघडले-४, ब पाकीट उघडण्याची सरासरी-१८.१८%

शहर भरात वारंवार काही ठेकेदार संगनमत (रिंग) करून निविदा सादर करतात.

तसेच ठेकेदार आणि राजकीय दबावाखाली येऊन अधिकारी पात्र असलेल्या ठेकेदाराला अपात्र तर अपात्र ठेकेदाराला पात्र ठरवत **(पान ३ वर)**

# कंत्राटी ड्रायव्हर यांच्या मागण्यांबाबत पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना कामगार हितरक्षक संघाकडून निवेदन देण्यात आले





**पुणे** : पुणे महानगरपालिका मोटार वाहन विभागातील कंत्राटी ड्रायव्हर यांच्या ववविध न्याय्य व प्रलंबित मागण्यांसंदर्भात दिनांक १०/०८/२०२६ रोजी कामगार हितरक्षक संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने शांततापूर्ण आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात प्रभाग क्र.६ येथील चारही कॉंग्रेसचे नगरसेवक यांनी उपस्थित राहून कामगार हितरक्षक संघाच्या सभासदांना आम्हीही तुमच्या पाठीशी आहोत असे आवाहन करत धिर दिला. आणि प्रशासन स्तरावर आपल्या मागण्याची नोंद घेण्यात यावी म्हणून आम्हीही सभागृहामध्ये जाब विचारू असे नगरसेवक ॲड.अविनाश साळवे, अश्विनीताई लांडगे, विशाल मलके म्हणाले. तसेच यावेळी कामगार हितरक्षक संघाचे अध्यक्ष सचिन चव्हाण, उपाध्यक्ष उमेश गवळी, नितीन अडागळे, मनोज बागडे, सुजित गायकवाड, निलेश जाधव, विकास कांबळे, चेतन भाटे, सुदामा गोसावी, अभिषेक अडागळे यांच्यासह कंत्राटी ड्रायव्हर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुणे महानगरपालिका अंतर्गत अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले कंत्राटी ड्रायव्हर कोविड-१९ महामारीच्या कठीण, काळातही स्वत:च्या व आपल्या कुटुंबाच्या जीवाची पर्वा न करता अत्यावश्यक सेवा बजावत होते. तरीदेखील आजपर्यंत त्यांच्या न्याय्य मागण्यांवर कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. म्हणून कामगार हितरक्षक संघाच्या वतीने आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनामध्ये मागणी करण्यात आली आहे. की, सर्व कंत्राटी ड्रायव्हर यांना कायम सेवेत सामावून घ्यावे, ८ तासांची नियमित ड्युटी लागू करावी. अन्यथा अतिरिक्त ४ तासांच्या कामाचा ओव्हरटाईम शासन नियमानुसार अदा करावा, कामाची वेळ निश्चित करावी, पगारवाढीमुळे ESIउसुविधा बंद झालेल्या कामगारांना उपचारासाठी सक्षम व कॅशलेस वैद्यकीय विमा सुविधा उपलब्ध करून द्यावी. सध्याची WC पॉलिसी अपुरी असून त्यामध्ये आवश्यक उपचार मिळत नाहीत, कामावर अपघात झालेल्या कंत्राटी ड्रायव्हरांना संपूर्ण वैद्यकीय उपचार व आर्थिक संरक्षण देण्यात यावे, या सर्व मागण्यांबाबत यापूर्वी अनेक वेळा निवेदने, पत्रव्यवहार व पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे आज लोकशाही मार्गाने शांततापूर्ण आंदोलन करण्यात आले आहे.

तरी आपण या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन आमच्या न्याय्य मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. अन्यथा कामगार हितरक्षक संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने भविष्यात अधिक तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल. असे श्री,शरद भाकरे, संस्थापक अध्यक्ष, कामगार हितरक्षक संघ, महाराष्ट्र राज्य यांनी गंभीर इशारा दिला आहे. तसेच ते म्हणाले की, याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील.

# पुणे शहरातील रस्त्यावरील खड्डे ८ दिवसात बुजवून अहवाल सादर करा...

**(पान २ वरून)** असल्याचे चित्र आहे. यावर पुणे महापालिका आयुक्त यांनी दि.१४/८/२०२६ रोजी पुणे महानगरपालिकेमार्फत विविध विभागांकडील विकास कामांच्या तांत्रिक गुणवत्तेबाबत उपाययोजना करणेसंदर्भात परिपत्रक काढून विकास कामांच्या अनुषंगाने आदर्श कार्यपद्धतीचे (SOP) पालन करण्याची दक्षता सर्व संबंधित खातेप्रमुख यांनी घ्यावी असे सांगितले. यामध्ये ते म्हणतात की, पुणे महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये विविध नागरी सुविधा पुरविण्यात येतात. सदरच्या सुविधा पुरविण्यासाठी विकास कामे हाती घेण्यात येतात. या विकास कामांच्या अंमलबजावणीसाठी निविदा मागविण्यात येऊन सर्वात कमी निविदा दाराकडून कामे पूर्ण करण्यात येतात. बऱ्याच वेळा काही विकास कामांच्या निविदा काढल्या असता अत्यंत कमी दरांच्या निविदा प्राप्त होतात. काही वेळा भांडवली व अनेक वेळा देखभाल दुरुस्ती कामांसाठी अत्यंत कमी रकमेच्या निविदा येतात. त्या दराने संबंधित ठेकेदाराना कार्यारंभ आदेश देण्यात येतात. इतक्या कमी दराने प्राप्त झालेल्या निविदांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कामांच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होतात, ही वस्तुस्थिती आहे. यासंदर्भात संदर्भ क्रमांक १ अन्वये मा. स्थायी समितीमध्ये चर्चा करण्यात आली होती. दर्जात्मक कामे होण्यासाठी प्रशासनाने काही उपाय योजना सुचवावी असे आदेशित करण्यात आले होते. त्या अनुषंगाने दिनांक ०५/०३/२०२६ रोजी तांत्रिक गुणवत्ता समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीला वर नमूद बाबींसंदर्भात अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार सदर तांत्रिक समितीमध्ये शहर अभियंता यांचे नेतृत्वाखाली सर्व खात्यांचे मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांचा समावेश होता. समितीने आपल्या स्तरावर विविध बैठका घेऊन त्यानुसार कामांसंदर्भात आदर्श कार्यपद्धतीची (SOP) शिफारस केलेली आहे. सदरची आदर्श कार्यपद्धती करताना अत्यंत कमी दराने आलेल्या निविदांच्या अनुषंगाने होणाऱ्या कामांचा दर्जा योग्य पद्धतीचा राहील याची शाश्वती नसल्याने कमी कालावधीत फायदा दिसत असला तरी दिर्घकालीन विचार करता काम लवकर खराब झाल्यास त्यावर पुन्हा खर्च करणे क्रमप्राप्त होणार आहे व पुणे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसानच होणार आहे. ही बाब केंद्रबिंदू धरून सोबत जोडलेल्या आदर्श कार्यपद्धतीचे (SOP) पालन करण्याची दक्षता सर्व संबंधित खातेप्रमुख यांनी घ्यावी.

**पुणे महानगरपालिकेमार्फत विविध विभागांकडील विकास कामांच्या अनुषंगाने तांत्रिक गुणवत्ता समितीच्या शिफारशी**

१. सद्य परिस्थितीत पुणे महानगरपालिकेकडील अभियांत्रिकी कामांसाठी EIL या त्रयस्थ संस्थेची नेमणूक करण्यात आलेली आहे. तथापि, पुणे महानगरपालिकेच्या सर्व कामांची व्याप्ती पाहता EIL यांचे बरोबर केंद्र सरकारच्या RITS या संस्थेची त्रयस्थ तपासणी कन्सल्टंट म्हणून नेमणूक करणे आवश्यक आहे.

२. सदर कंपन्यांना कार्यादेश दिल्यानंतर दर तीन महिन्यांनी सुरु कामांचे रनिंग बिल रेकॉर्ड करून कार्यकारी अभियंता यांचेकडे सादर करणे आवश्यक राहील.

३. मुख्य खाते व क्षेत्रीय कार्यालयाकडील १ कोटी पर्यंतच्या मेंटेनन्स कामांसाठी स्वतंत्र प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट म्हणून नेमणूक करणे आवश्यक आहे (PMC)

४. पुणे महानगरपालिकेकडील अभियंता वर्गास कामाच्या गुणवत्तेबाबत वेळोवेळी प्रशिक्षण देऊन कामाच्या परिमाणाच्या ८५% तपासणी पुणे महानगरपालिकेच्या कनिष्ठ व उप अभियंत्याकडून करणे व १५ टक्के परिमाणाची तपासणी थर्ड पार्टी यांच्याकडून करणे. कामापुर्वीचे व काम झालेनान्तारचे फोटो घेणे. उदाहरणार्थ NABL या मान्यताप्राप्त प्रयोगशाळांकडून तपासणी करून घेणे बंधनकारक राहील. याबाबत सदर NABL मान्यता प्राप्त प्रयोगशाळांची यादी तपासून जास्तीत जास्त लॅब उपलब्ध होतील याबाबत तपासणी करणे आवश्यक आहे.

५. पुणे महानगरपालिकेकडे काम करणाऱ्या ठेकेदारांना RMC प्लांट्स व PUV सर्टिफिकेट प्रमाणपत्र बंधनकारक करणे.

६. पथ व वाहतूक नियोजन विभागाकडून करण्यात येणाऱ्या थर्मोप्लास्टिक पॅटच्या कामाबाबत ग्लासबिट्सची तपासणी करण्यासाठी तसेच 3M_ साइन बोर्ड बसवणे आवश्यक आहे. थर्मोप्लास्टिक पेंट कामाची निविदा प्रसिद्ध करताना पेंट केलेल्या कामांची दर तीन महिन्यातून एकदा स्वच्छता करणे याबाबत दराचा समावेश करणे आवश्यक राहील..

७. विदयुत विभागाकडे डायरेक्ट कंपनीकडून सप्लाय करण्यात येणारे मटेरियल, पोल, सर्विस वायर्स, स्विचेस, इत्यादी यांच्या परिमाणाच्या ५% NABL लॅब कडून तपासणी करुन पुरवठा करणे आवश्यक राहील वायरिंग कामासाठी इलेक्ट्रिकल इन्स्पेक्टर चे सर्टिफिकेशन बंधनकारक राहील.

८. भवन विभागाकडे सर्वसाधारणपणे २० ते ४०% कमी दराने निविदा प्राप्त होत आहेत, याबाबत दराची तपासणी करून २०% व त्यापेक्षा कमी दराने निविदा प्राप्त झाल्यास त्या कामाची गुणवत्ता चांगली राहील याची शाश्वती नसल्याने तसेच कमी दरामुळे कामाचे परिमाण देखील बाधित होण्याची शक्यता असल्याने २०% वा त्यापेक्षा कमी दराच्या निविदा आल्यास त्या रद्द करून नव्याने निविदा प्रक्रिया राबविणे योग्य राहील.

९. ईआयएल कंपनीचे बिल फक्त पथ विभागाकडे सादर करण्यात येते. सदर बिल सर्व संबंधित विभागांकडे पाठविणे आवश्यक आहे.

१०. क्षेत्रीय कार्यालय/परिमंडळ निहाय **Third Party Inspection** संस्था स्वतंत्रपणे नेमण्यात यावी. त्यांनी दर महिन्याने कामे तपासून (दिवाळी / मार्च अखेर) त्याप्रमाणे अहवाल वेळेमध्ये देणे बंधनकारक आहे.

११. खात्याच्या निविदा समितीला निविदा नाकारण्याबाबत अधिकार आहेत.

१२. पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागांकडून करण्यात येणारे कामाबाबत आदर्श कार्यप्रणाली (Standard Operating Procedure) तयार करण्यात आलेली असून त्याचा परिशिष्ट अ मध्ये समावेश केला आहे

१३. EIL संस्थेकडे तांत्रिक कर्मचारी पुरेसे नसल्याने कामांना व गुणवत्ता तपासणीला विलंब होतो. त्यामुळे EIL कडील तांत्रिक मनुष्यबळ वाढविणे आवश्यक आहे EIL संस्था किंवा अन्य तपासणी संस्था यांचेकडून प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयनिहाय एक सिव्हील अभियंता व एक स्थापत्त्य अभियंता व एक विद्यीत अभियंता नेमणे गरजेचे आहे.

१४. भवन विभागाकडील कामांमध्ये कलादालने, नाट्यगृहे, स्मारके अशा मोठ्या प्रकारच्या प्रकल्पांच्या कामांसाठी १० कोटींवरील किमतीच्या प्रकल्पांसाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट नेमणे आवश्यक आहे.

आता या आदेशानुसार अहवाल सादर होईल. आणि पुढील कार्यवाही होतील. पण पावसाळ्यापुर्वी लावण्यात आलेल्या कामाचे काय? हा प्रश्नच आहे?

# देशाची सध्याची राजकीय परिस्थिती पाहता कॉँग्रेस पक्षाला...

**(पान १ वरून)** यावेळी पुणे शहर जिल्हा कॉँग्रेस कमिटी पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी, माजी आमदार रमेश बागवे, मोहन जोशी, प्रदेश प्रवक्ते अतुल लोंढे, सुनिल मलके, वीरेंद्र किराड, नगरसेवक अरविंद शिंदे, रफिक शेख, अविनाश बागवे, लता राजगुरू, महिला अध्यक्षा स्वाती शिंदे, युवक अध्यक्ष सौरभ अमराळे, इंटक अध्यक्ष चेतन अगरवाला, सेवादलाचे रविंद्र म्हसकर, लतेंद्र भिंगारे, जयंत किराड, प्रवीण करपे, गौरव बोराडे, राजेंद्र भुतडा, बाळासाहेब अमराळे, धनंजय दाभाडे, सुभाष जेधे, हर्षद हांडे, चैतन्य पुरंदरे, राजेंद्र पडवळ, राजाभाऊ कदम, द. स. पोळेकर, अशोक लांडगे, ड. निलेश बोराटे, शाम काळे, राजू साठे, रमेश सोनकांबळे, विशाल जाधव, आसिफ शेख, अस्लम बागवान, गुलामहुसेन खान, अर्चना शहा, प्राजक्ता जाधव, प्राची दुधाणे, सीमा सावंत, ज्योती परदेशी, सुंदर ओव्हाळ, उषा राजगुरू, रवि ननावरे, स्वप्निल नाईक, विजय साबळे, हरिदास अडसूळ, रंजना रजपूत, एम. एम. फुलगावकर, , दिलीप लोळगे आदींसह असंख्य कॉँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त शाखा उद्घाटन करून...

**(पान १ वरून)** या शाखेचे अध्यक्ष सैफान शेख आणि उपाध्यक्ष उमेश जाधव यांनी ध्वजरोहणाचा कार्यक्रम झाल्यावर अमरभाऊ पंडागळे, रागिनीताई गुंजाळ, लक्ष्मण चोरगे, प्रविण शेख, मलिका शेख, बालाजी गायकवाड, शाहिद शेख, आप्पासाहेब गायकवाड, प्रेम वाघमारे यांचा आणि उपस्थित असलेल्या मान्यवराचे स्वागत करून सफाई सेवक व लहान मुलांना यावेळी खाऊ वाटप करण्यात आले.

# स्वातंत्र्यदिनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते ध्वजारोहण



**पुणे :** भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते विधानभवन येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले.

ध्वजारोहणानंतर राज्यपाल श्री. जिष्णु देव वर्मा यांनी स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, नागरिक तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांची भेट घेऊन त्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष विरधवल जगदाळे, महापौर मंजुषा नागपुरे, आमदार डॉ.निलमताई गोऱ्हे, बापूसाहेब पठारे, विभागीय आयुक्त शीतल तेली -उगले, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, यांच्यासह सैन्यदलातील अधिकारी, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, नागरिक तसेच शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

# शिवछत्रपती क्रीडा संकुलातील अत्याधुनिक जिमचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते उद्घाटन



**पुणे :** शिवछत्रपती क्रीडा संकुल, महाळुंगे-बालेवाडी येथील अत्याधुनिक जिमचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. शिवछत्रपती क्रीडा संकुलात मिशन लक्ष्यवेध योजनेंतर्गत सात क्रीडा प्रकारांचे हाय परफॉर्मन्स सेंटर कार्यान्वित असून ही अत्याधुनिक जीम खेळाडूंना चांगल्या कामगिरीसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी क्रीडा आयुक्त दीपक सिंगला, सहसंचालक सुधीर मोरे, उपसंचालक संजय सबनीस, माणिक पाटील, क्रीडा अधिकारी चनबस स्वामी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री म्हणाल्या, आधुनिक व्यायाम साहित्य, अद्ययावत सुविधा आणि खेळाडूंच्या गरजा लक्षात घेऊन या जिमची उभारणी करण्यात आली आहे. विविध क्रीडा प्रकारांतील खेळाडूंना त्यांच्या प्रशिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी या सुविधेचा मोठा फायदा होईल.

बालेवाडी येथे राज्य शासनाची क्रीडा प्रबोधिनी व केंद्र शासनाच्या खेलो इंडिया योजनेंतर्गत राज्य निपुणता केंद्र कार्यान्वित करण्यात आलेले आहे. शिवछत्रपती क्रीडा संकुलाकरिता शासनाकडून एकूण रु.७३६. ५९ लक्ष इतका निधी प्राप्त झालेला असून त्यामधून आधुनिक फिटनेस सेंटर उभारण्यात आले आहे. त्यापैकी बांधकामाकरीता रू.४७० लक्ष तर आवश्यक साहित्याकरीता रू.२६६.५९ लक्ष खर्च करण्यात आलेला आहे.

शिवछत्रपती क्रीडा संकुल १५१ एकर परिसर असून या परिसरामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा विकसीत करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये शूटिंग, बॉक्सींग, जिम्नॅस्टिक्स, वेटलिफ्टिंग, जलतरण, थलेटिक्स, हॉकी, फूटबॉल, बॅडमिंटन हॉल, फिटनेस सेंटर, स्पोर्ट्स सायन्स सेंटर इ. सुविधा विकसीत करण्यात आलेल्या आहेत.

शिवछत्रपती क्रीडा संकुलात नॅशनल गेम्स १९९४, कॉमनवेल्थ युथ गेम्स २००८, खेलो इंडिया युथ गेम्स २०१९, एटीपी टेनिस २०१८ ते २०२२, वुमन फूटबॉल एशियन चॅम्पीयनशीप २०२१, १३ वी आशियाई थलेटिक्स स्पर्धा २०१३ तसेच विविध खेळांच्या राज्य राष्ट्रीय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. राज्य शासनाद्वारे सदर ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी कार्यरत असून या ठिकाणी ३८६ विविध खेळांचे दैनंदिन प्रशिक्षण घेण्यात येते. यावेळी ॲथलेटिक्स व वेटलिफ्टिंग या क्रीडा प्रकाराचे विदेशी क्रीडा मार्गदर्शक व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रंथालय आणि ग्रंथमित्र पुरस्कारांकरिता प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**पुणे :** 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार' तसेच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना देण्यात येणाऱ्या 'डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र)' पुरस्काराकरिता २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाकडून राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, ग्रंथालयांकडून नागरिकांना अधिक चांगल्या ग्रंथालयीन सेवा उपलब्ध करुन द्याव्यात, वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार' पुरस्कार तसेच भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांच्या नावाने 'डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र)' देण्यात येतात.

राज्यातील शहरी व ग्रामीण विभागातील 'अ', 'ब', 'क', 'ड' वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे १ लाख रुपये, ७५ हजार, ५० हजार, २५ हजार रुपये रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येते.

तसेच प्रत्येकी एक उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व एक उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना राज्यस्तरावरील पुरस्कारांतर्गत ५० हजार रुपये तर प्रत्येक महसुली विभागासाठी २५ हजार रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येते.

२०२५-२६ या वर्षाच्या पुरस्कारासाठी इच्छुक असणारी ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक (ग्रंथमित्र) यांनी आपले विहित नमुन्यातील प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह तीन प्रतीत आपल्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांकडे पाठवावेत, असेही राज्याचे प्र. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

नियमित वाचा...
सा. संघर्षाचा आवाज

# पुणे महानगरपालिकेच्या वतीने भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन समारंभ संपन्न





**पुणे :** भारताचा ८० वा स्वातंत्र्यादिन समारंभा दिनानिमित्त शनिवार दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी मा. महापौर सौ. मंजुषा दीपक नागपुरे, पुणे महानगरपालिका यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

मा. महापौर सौ. मंजुषा दीपक नागपुरे यांनी पुणे महानगरपालिके च्या प्रांगणातील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्टीत पुतळ्यास पुष्प अर्पण केली. त्यानंतर महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण केले. त्यानंतर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.त्या नंतर प्रथम 'राष्ट्रीय गीत' (वंदे मातरम) म्हणण्यात आले. त्यानंतर मा. महापौर सौ. मंजुषा दीपक नागपुरे यांचे शुभ हस्ते ध्वजारोहण व ध्वजवंदन करण्यात आले. यावेळेस 'राष्ट्रगीत' व महाराष्ट्र राज्याचे 'राज्यगीत' म्हणण्यात आले.

या प्रसंगी मा. महापालिका आयुक्त श्री.नवल किशोर राम, व मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) श्री.प्रजित नायर मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) श्री.ओमप्रकाश दिवटे, आणि विविध विभागांचे खातेप्रमुख, उपायुक्त,अधिकारी कर्मचारी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

पुणे महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाकडून झेंडा वंदन झाल्या नंतर भव्य सायकल रॅली चे आयोजन करण्यात आले होते. सदर सायकल रॅली पुणे महानगरपालिका सायकल क्लबच्या सहकार्याने आयोजित केली होती. या मध्ये सायकल स्वार मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सदर सायकल रॅलीची मा. महापौर सौ. मंजुषा दीपक नागपुरे व मा.महापालिका श्री.आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते झेंडा दाखवून सुरवात करण्यात आली. सदर सायकल रॅली हि पुणे मनपा भवन - मॉडर्न कॅफे - जंगली महाराज रास्ता-खंडोजी बाबा चौक-अलका टॉकीज चौक-टिळक रोड-पुराम चौक-बाजीराव रस्ता - शनिवार वाडा-पुणे मनपा भवन येथे समारोप करण्यात आला.

# जिल्हाधिकारी कार्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रध्वजाला मानवंदना



भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवून मानवंदना देण्यात आली.

यावेळी अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, तहसीलदार श्वेता पवार तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी यावेळी उपस्थितांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.